# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक – ३०

**(सभावृत्तांत)**

दिनांक – १०/१०/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक १०/१०/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ढंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.अमित राजेंद्र गावडे
१४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील,मा.तुपे,मा.दुधेकर, मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे,मा.दुरगुडे,मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोत,मा.राऊत, मा.बहुरे,मा.दांगट-सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,मा.निकम,मा.सवणे,मा.इंगळे,मा.चव्हाण,मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.जुंधारे, मा.गलबले,मा.कांबळे,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले,मा.मोरे,मा.पाटील,मा.घुबे-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक २९) तरतुद वर्गीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक ३०) मनपा मधील विविध प्रकारच्या, उदा.शाळा,रूग्णालये,वाचनालय,मनपा कार्यालये,नाट्यगृहे, बहुउद्देशीय इमारती, जलतरण तलाव इ. इमारतींच्या आर.सी.सी. डिझाईनची तपासणी करणेबाबत...

विषय क्रमांक ३१) क प्रभाग कासारवाडी उप विभागातील टाक्यांवरुन पाणीपुरवठा करण्यासाठी मजुर पुरविणेबाबत...

विषय क्रमांक ३२) पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ उद्यान विकसित करण्याकरिता मनपा नियमानुसार १.२५% फी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून अदा करणेबाबत-मा.उषा मुंढे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३३) श्रीम.सोनाली रजनीकांत एक्के,स्टाफ नर्स,तालेरा रुग्णालय यांचे अपील अर्जाबाबत-मा.अमित गावडे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३४) मा.स्थायी समिती सभा मंगळवार दि.१७/१०/२०१७ रोजी दुपारी १२.०० वा. आयोजित करणेबाबत-मा.अमित गावडे,मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३५) निळूभाऊ फुले नाट्यगृह, पिंपळे गुरव येथील पार्किंग व कॅन्टीन चालविण्यास देणेबाबत-मा.उषा मुंढे,मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३६) ड क्षेत्रीय कार्यालयासमोरील कॅन्टीन केबीन चालविण्यास देणेबाबत-मा.उषा मुंढे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३७) पिंपरी चिंचवड क्षेत्रातील महिला बचतगटांना प्रोत्साहन देणेकामी दिवाळी सणानिमित्त वस्तूंचे प्रदर्शन व विक्री करणेकामी स्टॉल उपलब्ध करुन देणेबाबत-मा.हर्षल ढोरे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३८) पिंपरी चिंचवड शहर जिल्हा कुस्तीगीर संघ, चिंचवड यांच्या नावे रोख बक्षिस अदा करणेबाबत-मा.कुंदन गायकवाड, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३९) प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव (नवीन प्रभाग क्र.३१) येथील स्थापत्य विषयक कामांकरिता तरतूद वर्ग करणेबाबत-मा.उषा मुंढे,मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४०) प्रभाग क्र.१ चिखली या प्रभागाकरिता तरतूद वर्ग करणेबाबत-मा.कुंदन गायकवाड, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४१) क व ड प्रभागातील (क,ड व ई क्षेत्रीय) स्लजची मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतुक करणेबाबत...

विषय क्रमांक ४२) ह क्षेत्रीय कार्यालय येथील कॅन्टीन चालविण्यास देणेबाबत – मा.आशा धायगुडे शेंडगे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

-----------

दिनांक २७/०९/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २८) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

ठराव क्रमांक – १११५ | विषय क्रमांक – १
दिनांक – १०/१०/२०१७ | विभाग - झोनिपु स्थापत्य
सूचक – मा.लक्ष्मण उंडे | अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ – मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२५५/२०१७ दि.२७/०९/२०१७

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/१२-२०१६-१७ मधील अ.क्र.०४ अन्वये प्रभाग क्र.४२ आंबेडकरनगर बौध्दनगर, रमाबाईनगर झोपडपट्टीमध्ये ठिकठिकाणी क्रॉक्रीट पेव्हिंग करणे व आवश्यक त्या ठिकाणी स्ट्रॉर्म वॉटर लाईन टाकून पेव्हर ब्लॉक बसविणेकामी मे. संकल्प इन्फ्रास्ट्रक्चर नि.र.रु.१६,३३,९१८/- (अक्षरी र.रु.सोळा लाख तेहतीस हजार नऊशे अठरा फक्त) पेक्षा १२.१०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.१४,३६,२१४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१११६ | विषय क्रमांक – २
दिनांक – १०/१०/२०१७ | विभाग - झोनिपु स्थापत्य
सूचक – मा.उषा मुंढे | अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ – मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२५४/२०१७ दि.२७/०९/२०१७

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/१२-२०१६-१७ मधील अ.क्र.०९ अन्वये प्रभाग क्र.४२ मधील झोपडपटट्मध्ये रमाबाईनगर व आंबेडकरनगर येथील नाल्याच्या भिंतीची उंची वाढविणे व संरक्षक भिंत तयार करणेकामी मे. संकल्प इन्फ्रास्ट्रक्चर नि.र.रु.२३,३१,५३२/- (अक्षरी र.रु.तेवीस लाख एकतीस हजार पाचशे बत्तीस फक्त) पेक्षा ११.५०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.२०,६३,४०६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन एजन्सीस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १११७ विषय क्रमांक – ३

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग - स्थापत्य

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/२६१/१७ दि.२९/०९/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/१४/१७-१८ भोसरी प्रभाग क्र.३३ गवळीनगर मधील भागात ट्रिमिक्स कॉंक्रीट व पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी मे.सुयोगराज कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२३,३३,२२७/-(अक्षरी र.रु.तेवीस लाख तेहतीस हजार दोनशे सत्तावीस फक्त) पेक्षा १९.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१८,६६,८१५/- पर्यंत काम करुन घेणेस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १११८ विषय क्रमांक – ४

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग – माहिती व जनसंपर्क

सूचक – मा.कोमल मेवानी अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/३/कावि/५०६/२०१७ दि.१४/०९/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भारत सरकारचा CSR (Corporate Social Responsibiilty ) उपक्रम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये राबविणेकरीता पिंपरी चिंचवड परिसरातील विविध खाजगी कंपनी/संस्था तसेच एन.जी.ओ. यांचे समवेत दि.1 जुलै 2017 रोजी हॉटेल सिट्रस, एमआयडीसी, चिंचवड येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या वेळी भोजन व्यवस्थेपोटी थेट पध्दतीने झालेला एकूण खर्च र.रु.1,47,600/-(अक्षरी र.रु.एक लाख सत्तेचाळीस हजार सहाशे फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १११९ विषय क्रमांक – ५

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग - माहिती व जनसंपर्क

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/४/कावि/९०/२०१७ दि.०३/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने जगद्गुरू महर्षी वाल्मिकी जयंती महोत्सवा अंतर्गत दि.०४/१०/२०१७ व दि.०५/१०/२०१७ रोजी जगद्गुरू महर्षी वाल्मिकी जयंती महोत्सवानिमित्त भजन संध्या, संबंधितांचे मानधन, फ्लेक्स, बॅनर, स्मृतिचिन्ह व भोजन, चहापान, व्यवस्था इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रमासाठी अंदाजे र.रू.२,२३,०००/- इतका थेट पध्दतीने खर्च अपेक्षीत आहे. या खर्चास अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११२० विषय क्रमांक – ६

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग – शिक्षण मंडळ

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.शि/८/कावि/१७३/२०१७ दि.२६/९/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांचा गुणवत्ता विकास प्रकल्पाबाबत श्री.आदित्य शिंदे, गुरुकुल प्रकल्प प्रमुख, ज्ञानप्रबोधिनी, निगडी, पुणे. यांनी दिनांक ११/९/२०१७ रोजी पत्र दिले आहे. या पत्रामध्ये प्रकल्पांसठी ज्ञानप्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री.अजितराव कानिटकर यांनी काही वेळ मनपा शाळांना गुणवत्ता विकास प्रकल्पासाठी देण्याचे मान्य केले आहे. सद्यस्थितील मनपा शाळेतील पटसंख्या वाढविणे, टिकविणे आणि असलेल्या मुलांसाठी दर्जेदार शिक्षणाची व्यवस्था उभी करणे हे आव्हान पेलण्यासाठी राजकीय, प्रशासकीय यंत्रणा, परिसरातील सामाजिक-शैक्षणिक संस्था आणि पालिकेतील अनेक उत्साही शिक्षक एकत्र येऊन अपेक्षित बदल घडवून शैक्षणिक गुणवत्ता आणि प्रेरणा जागृती प्रकल्प ज्ञानप्रबोधिनी आणि महानगरपालिका एकत्रितपणे योजण्याचा प्रकल्प राबविणेकामी येणा-या एकूण खर्च र.रु.५,६०,०००/-(अक्षरी र.रु.पाच लाख साठ हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११२१ विषय क्रमांक – ७

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५४२/१७ दि.२८/९/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/३८/२०१७-१८ प्रभाग क्र.८ (नविन प्रभाग क्र.१०) मधील दिशादर्शक, सुचना फलक व रोड फर्निचरची कामे करणेकामी M/s.Shriguru Construction नि.र.रु.२२,४०,०४०/- (अक्षरी र.रू.बावीस लाख चाळीस हजार चाळीस फक्त) पेक्षा १८.१०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु १८,३४,५९३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११२२ विषय क्रमांक – ८

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५४८/१७ दि.४/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/१४/२०१७-१८ प्रभाग क्र. ८ मध्ये पेव्हींग ब्लॉक, पावसाळी गटर्स इ. स्थापत्यविषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी M/s.Bhalerao Construction नि.र.रु.१९,६०,७७९/- (अक्षरी र.रू.एकोणावीस लाख साठ हजार सातशे एकोणऐंशी फक्त) पेक्षा १७.८५% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१६,१०,७८०/- पर्यंत काम करून घेणेस

तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११२३ विषय क्रमांक – ९

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग – स्थापत्य फ मुख्यालय

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/कावि/५६/१७ दि.४/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते २२) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११२४ विषय क्रमांक – १०

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग – स्थापत्य क/ह मुख्यालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/कावि/२९६/१७ दि.३/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभाग क, ह मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (१ ते ६) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११२५ विषय क्रमांक – ११

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग - उदयान

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक–मा.अनुराधा गोफणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/३६०/२०१७ दि.२९/०९/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.६/२०१७-१८ मनपाचे क, ड ,ई क्षेत्रिय कार्यालयातील विविध रस्ते दुभाजकामधील गॅप भरणेकामी रोपे व माती खरेदी करणेबाबतचे कामकाज मे.न्यु गार्डन गुरूज् फार्म अँन्ड नर्सरी यांचे कोटेशन नोटीस अंदाजपत्रकिय दर र.रू.१,५७,३००/-

(अक्षरी र.रू.एक लाख सत्तावन्न हजार तीनशे फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०२% ने कमी १,५४,१५४/- या दराचे कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/६/कावि/३५९/२०१७ दि.२८/०९/२०१७ अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११२६ | विषय क्रमांक – १२

दिनांक – १०/१०/२०१७ | विभाग - उदयान

सूचक – मा.कैलास बारणे | अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/३६२/२०१७ दि.२९/०९/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.५/२०१७-१८ मनपाचे प्रभाग क्र.२६ व २९ मधील विविध रस्ते मध्ये दुभाजक सुशोभिकरण करणेबाबतचे कामकाज मे.अथर्व स्वयं.औद्यो.सेवा.सह.संस्था यांचे कोटेशन नोटीस अंदाजपत्रकिय दर.रू.१,९९,५७२/- (अक्षरी र.रू.एक लाख नव्यान्नव हजार पाचशे बहात्तर फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०१% ने कमी १,९७,५७६/- या दराचे कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/६/कावि/३६१/२०१७ दि.२८/०९/२०१७ अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११२७ | विषय क्रमांक – १३

दिनांक – १०/१०/२०१७ | विभाग - पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.लक्ष्मण उंडे | अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ – मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पअक/१/कावि/६२६/१७ दि.५/१०/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV७/३-२०१६-१७ मधील चिखली १२५३ पंपहाऊस येथे जुन्या तीनही पंपाचे आर्युमान संपलेले असलेने सन २०१६-१७ मध्ये तेथील एक जुना पंप काढुन त्याजागी नविन पंप बसविणेकामी मे.एक्सेल इलेक्ट्रीकल्स यांचेकडुन नि.र.रु.१५,२७,०१२/- (अक्षरी र.रू.पंधरा लाख सत्तावीस हजार बारा फक्त) पेक्षा -०५.००% कमी या दराने करुन घेणेस यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११२८ | विषय क्रमांक – १४

दिनांक – १०/१०/२०१७ | विभाग – स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.उषा मुंढे | अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५५४/१७ दि.५/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/२६/२०१७-१८ प्रभाग क्र.१९ रावेत, किवळे, मामुर्डी स्मशानभुमीची किरकोळ दुरुस्ती करणेकामी **M/s.Vishnu Vithoba Narale** नि.र.रू.२३,२४,११७/-

(अक्षरी र.रू. तेवीस लाख चोवीस हजार एकशे सतरा फक्त) पेक्षा १६.८४% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रू.१९,३२,७३६/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११२९ विषय क्रमांक – १५
दिनांक – १०/१०/२०१७ विभाग - स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५५२/१७ दि.५/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. १०/२१/२०१७-१८ प्रभाग क्र.१९ अंतर्गत मनपा इमारतीची स्थापत्य विषयक कामे करणेकामी M/s.Shankar Pandurang Bajbalkar नि.र.रु.१९,५२,८५५/- (अक्षरी र.रू. एकोणवीस लाख बावन्न हजार आठशे पंचावन्न फक्त) पेक्षा १६.८४% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१६,२३,९९४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११३० विषय क्रमांक – १६
दिनांक – १०/१०/२०१७ विभाग - स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.कोमल मेवानी अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५५३/१७ दि.५/१०/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/५/२०१७-१८ प्रभाग क्र.१९ मध्ये पेव्हिंग ब्लॉक, पावसाळी गटर्स इ. स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी M/s.Vishnu Vithoba Narale नि.र.रु.१९,६०,२७७/-(अक्षरी र.रू.एकोणवीस लाख साठ हजार दोनशे सत्याहत्तर फक्त) पेक्षा २३.८५% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१४,९२,७५१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११३१ विषय क्रमांक – १७
दिनांक – १०/१०/२०१७ विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ–मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जेएनएनयुआरएम/३/कावि/३८६/२०१७ दि.६/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये केंद्र शासनाचे धोरणानुसार CSR Activity राबविणेसाठी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली दि.१८/११/२०१६ रोजी घेणेत आलेल्या सभेमध्ये CSR Expert सल्लागार मानधनावर नेमणेकामी निर्णय झाला आहे. तसेच सदर CSR Expert

सल्लागार नेमणेकामी र.रू.७०,०००/- प्रति महा इतके मानधन निश्चित करणेकामी प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. सदर CSR Expert सल्लागार नेमणेकरीता MBA CSR पदवीका प्राप्त अथवा MBA शिक्षण पुर्ण, CSR विषयक अनुभवासह अशी शैक्षणीक अर्हता ठरविणेत आलेली होती. त्यानुसार वर्तमानपत्रामध्ये जाहीरात देऊन इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त अर्जांपैकी ज्यांनी CSR विषयक कामाचा अनुभव असल्याचे त्यांचे माहिती पत्रामध्ये नमुद केले आहे अशा एकूण ११ उमेदवारांची अतिरिक्त आयुक्त यांचेमार्फत मुलाखत घेणेत येऊन त्यापैकी ४ उमेदवारांना पात्र करून त्यांची अंतिम मुलाखत दि.१८ सप्टेंबर २०१७ रोजी आयुक्त यांनी घेतलेली आहे. सदर अंतिम मुलाखतीचे अनुषंगाने श्री.विजय वावरे, एम.ए. सामाजिक शास्त्र यांना CSR Expert सल्लागार म्हणून र.रू.७०,०००/- प्रति महा एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीकरीता नेमणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११३२ | विषय क्रमांक – १८

दिनांक – १०/१०/२०१७ | विभाग - मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.अमित गावडे | अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१६२/२०१७ दि.०६/१०/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१८.०९.२०१७ ते दि.२४.०९.२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१६२/२०१७ दि.०६.१०.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११३३ | विषय क्रमांक – १९

दिनांक – १०/१०/२०१७ | विभाग - मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.उत्तम केंदळे | अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ – मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१६३/२०१७ दि.०६/१०/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२५.०९.२०१७ ते दि.०१.१०.२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१६३/२०१७ दि.०६.१०.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११३४ विषय क्रमांक – २०

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग - लेखा

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/८८०७/२०१७ दि.६/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सहशहर अभियंता यांनी दि.२५/९/२०१७ चे प्रस्तावान्वये स्थापत्य बीआरटीएस विभागाकडील देहू आळंदी रस्त्यावरील विविध सेवा वाहिन्यांसाठी खोदलेला रस्ता व पदपथ यांचे चर पूर्ववत करणे या कामाचा २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात पान क्र.६८ अनु.क्र.२०५ अन्वये समावेश असुन कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.१.० कोटी इतकी असून तरतुद फक्त र.रु.५.० लाख इतकी उपलब्ध आहे. सदर कामाकरिता विभागाअंतर्गत र.रु.६२,००,०००/- वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – मा.सवणे (कार्य.अभियंता) यांचा कार्यभार कमी करावा किंवा त्यांचा विभाग बदलावा किंवा त्यांचा पदभार कमी करुन ठराविक कामकाज द्यावे.

----------

ठराव क्रमांक –११३५ विषय क्रमांक – २१

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग - लेखा

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/८८०९/२०१७ दि.०६/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकातील फ क्षेत्रिय कार्यालय/स्थापत्य मुख्यालयाकडील निगडी प्रभाग क्र.११,१२,१३ मध्ये प्रथम प्राधान्याने करावयाच्या ब-याचशा कामांसाठी तरतुद अपुरी असल्याने निविदा कार्यवाही करणे करिता तरतुदीत वाढ करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे “अ” भांडवली अंदाजपत्रकातील “फ” प्रभाग/मुख्यालय विभागांतर्गत र.रु.२,८३,२०,०००/- वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११३६ विषय क्रमांक – २२

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१०/कावि/४०४/२०१७ दि.६/१०/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विद्युत विभागाकरीता सन २०१६-१७ करीता एलईडी रेट्रोफिट ट्युब विथ ड्राईवर 18-20 व्हॅट साहित्य खरेदीबाबत ई.नि.सू.क्र.54/15/2016-17 अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यामधील प्राप्त ३ निविदांपैकी लघुत्तम निविदाकार मे पायोनियर सेल्स यांचे दर र.रु.10,58,000/- (अक्षरी र.रू.दहा लाख अठ्ठावन्न हजार फक्त) चे दर अंदाजपत्रकीय दरांपेक्षा 51.20% ने कमी असल्याने सदर दरास मा. सहा. आयुक्त यांनी मान्यता

दिलेली आहे. मे.पायोनियर सेल्स यांचेकडून सदर कामाचा करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आले असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११३७ विषय क्रमांक – २३

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग - मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक–मा.अनुराधा गोफणे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१०/कावि/४०५/२०१७ दि.६/१०/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विद्युत विभागाकरीता सन २०१६-१७ करीता ६० व्हॅट एलईडी स्ट्रिट लाईट फिटींग साहित्य खरेदीबाबत ई.नि.सू.क्र.५४/९/२०१६-१७ अन्वये,ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यामधील प्राप्त ३ निविदांपैकी लघुत्तम निविदाकार मे हेमंत ट्रेडींग कंपनी यांचे दर र.रु.७,३४,१००/- (अक्षरी र.रू. सात लाख चौतीस हजार शंभर फक्त) चे दर अंदाजपत्रकीय दरांपेक्षा ३९.०५% ने कमी असल्याने सदर दरास मा. सहा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. मे.हेमंत ट्रेडींग कंपनी यांचेकडून सदर कामाचा करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आले असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११३८ विषय क्रमांक – २४

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग - मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१०/कावि/४०३/२०१७ दि.६/१०/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विद्युत विभागाकरीता सन २०१६-१७ करीता एलईडी डाऊनलाईटर विथ ड्राईवर १३-१५ व्हॅट साहित्य खरेदीबाबत ई.नि.सू क्र. ५४/१६/२०१६-१७ अन्वये,ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यामधील ३ निविदांपैकी लघुत्तम निविदाकार मे पायोनियर सेल्स यांचे दर र.रु.६,७२,०००/-(अक्षरी र.रू. सहा लाख बाहत्तर हजार फक्त) हे दर अंदाजपत्रकीय दरांपेक्षा 65.70 ने कमी असल्याने सदर दरास मा. सहा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. मे. पायोनियर सेल्स यांचेकडून सदर कामाचा करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आले असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११३९ विषय क्रमांक – २५
दिनांक – १०/१०/२०१७ विभाग - मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१०/कावि/४०२/२०१७ दि.६/१०/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विद्युत विभागाकरीता सन २०१६-१७ करीता ४० व्हॅट एलईडी स्ट्रिट लाईट फीटिंग साहित्य खरेदीबाबत ई.नि.सू.क्र.५४/८/२०१६-१७ अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यामधील ३ निविदांपैकी लघुत्तम निविदाकार मे.हेमंत ट्रेडींग कंपनी यांचे दर र.रु.४,५७,५००/- (अक्षरी र.रू. चार लाख सत्तावन्न हजार पाचशे फक्त) हे दर अंदाजपत्रकीय दरांपेक्षा ४५.३८% ने कमी असल्याने सदर दरास मा. सहा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. मे. हेमंत ट्रेडींग कंपनी यांचेकडून सदर कामाचा करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आले असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११४० विषय क्रमांक – २६
दिनांक – १०/१०/२०१७ विभाग - मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/४०१/२०१७ दि.६/१०/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विद्युत विभागाकरीता सन २०१६-१७ करीता २२० व्हॅट एलईडी स्ट्रिट लाईट फीटिंग साहित्य खरेदीबाबत ई.नि.सू.क्र.५४/१४/२०१६-१७ अन्वये,ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यामधील ३ निविदांपैकी लघुत्तम निविदाकार मे हेमतं ट्रेडींग कंपनी यांचे दर र.रु.६,२०,७६०/- (अक्षरी र.रू. सहा लाख वीस हजार सातशे साठ फक्त) हे दर अंदाजपत्रकीय दरांपेक्षा ३४.४६% ने कमी असल्याने सदर दरास मा. सहा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. मे.हेमंत ट्रेडींग कंपनी यांचेकडून सदर कामाचा करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आले असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११४१ विषय क्रमांक – २७
दिनांक – १०/१०/२०१७ विभाग - मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/४००/२०१७ दि.६/१०/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विद्युत विभागाकरीता सन २०१६-१७ करीता ८० व्हॅट एलईडी स्ट्रिट लाईट फीटिंग साहित्य खरेदीबाबत ई.नि.सू.क्र.५४/१०/२०१६-१७ अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यामधील ३ निविदांपैकी लघुत्तम निविदाकार मे हेमतं ट्रेडींग कंपनी यांचे दर र.रु.८,७४,२००/- (अक्षरी र.रू. आठ लाख चौ-याहत्तर हजार दोनशे फक्त) हे दर अंदाजपत्रकीय दरांपेक्षा ४६.९१% ने कमी असल्याने सदर दरास मा. सहा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. मे.हेमंत ट्रेडींग कंपनी

यांचेकडून सदर कामाचा करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आले असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११४२ | विषय क्रमांक – २८
दिनांक – १०/१०/२०१७ | विभाग–ब क्षेत्रिय कार्यालय, जलनिःसारण
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे | अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बक्षेका/जनि/कावि/१०/५१/२०१७ दि.६/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड मनपाचे ब प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेकामी मे. विशाल सिव्हील कॉन्ट्रॅक्टर करत असून सदर कामातील मुळ निविदा शर्थ व अट क्र.४ नुसार ५ वर्षापैकी पहिल्या दोन वर्षाची मुदत पुर्ण होत असल्याने पुढील एक वर्षे (तृतिय वर्ष) कालावधीसाठी येणा-या खर्चास व निविदा अटी व शर्ती मधील (A) मधील अट क्र.४ नुसार निविदा दरात १०% वाढ करून पुढील तृतिय वर्षा करिता मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे. सद्यस्थितीत चालू असलेले डिझेल चे दर व लेबरचे दर व सदर कामाचे आदेश दिले त्यावेळेसच्या दरांची तुलना केली असता प्रस्तावात नमूद प्रमाणे स्विकृती योग्य दर ५.८३% जास्त इतका येत आहे. डिझेल चे दर कमी होत असल्याने ठेकेदाराशी दर कमी करणेबाबत विचारणा केली असता डिझेलचे दर कमी झाले तथापि लेबरचे दर वाढले असल्याने ठेकेदाराने ५.००% दरवाढ मिळून काम करणेस संमती दिली आहे. त्यानुसार पुढील १ वर्ष कालावधीसाठी ५.००% दरवाढ देऊन येणारा खर्च र.रू.१,०६,०४,०९७/- (अक्षरी र.रू. एक कोटी सहा लाख चार हजार सत्त्यान्नव फक्त) पर्यंत काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच महापालिकेच्या नव्याने स्थापन झालेल्या ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील ड्रेनेज लाईन चोकअप काढणे, साफ करणे या कामासाठी कोणतीही यंत्रणा सद्यस्थितीत कार्यरत नाही. त्यामुळे या कामासाठी नवीन निविदा कार्यवाही करुन एजन्सी निश्चित होईपर्यंतचे कालावधीसाठी मे.बी.व्ही.जी.इंडीया लि. व मे.जे.डी.एंटरप्रायजेस यांचेकडे सद्यस्थितीत मशिनरी उपलब्ध असलेने मे.बी.व्ही.जी.इंडीया लि. व मे.जे.डी.एंटरप्रायजेस यांचेकडून संयुक्तरित्या ग व ह क्षेत्रीय कार्यालयांचे कार्यक्षेत्रातील ड्रेनेज लाईन मनुष्यबळाद्वारे तसेच यांत्रिक पद्धतीने चोकअप काढणे, साफ करणेचे काम, ब क्षेत्रीय कार्यालयाकडे सध्या चालू असलेल्या कामाच्या दराने देण्यास व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक –११४३ विषय क्रमांक – २९

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग–स्थापत्य बीआरटीएस

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उत्तम कैंदळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बी.आर.टी.एस./६८५/२०१७ दि.०९/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.६,५०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११४४ विषय क्रमांक – ३०

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग–स्थापत्य, अ क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अक्षेका/स्था/कावि/१६८८/२०१७ दि.०९/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा मधील विविध प्रकारच्या, उदा.शाळा,रूग्णालये,वाचनालय,मनपा कार्यालये,नाट्यगृहे, बहुउद्देशीय इमारती, जलतरण तलाव इ. इमारतींच्या आर.सी.सी. डिझाईनची तपासणी (Proof Checking) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे अथवा मा.आयुक्त सो यांच्या मान्यतेने तत्सम त्रयस्थ संस्थेमार्फत करणेस व त्यांना त्याकामी प्रकल्प खर्चाच्या ०.५०% एवढी फी व तपासणी नंतर करावयाच्या कामाकरिता मार्गदर्शन फी प्रकल्प खर्चाच्या ०.३०% एवढी सदर प्रकल्पाच्या तरतुदीमधुन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११४५ विषय क्रमांक – ३१

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग–पाणीपुरवठा

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.उत्तम कैंदळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/६३३/२०१७ दि.१०/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.९/४/२०१६-१७ अन्वये क प्रभाग कासारवाडी उप विभागातील टाक्यांवरुन पाणीपुरवठा करण्यासाठी मजुर पुरविणे या कामासाठी मे.भारतीय महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांची (निविदा रक्कम रु.-८६,०२,१७७/- अक्षरी- शहाऐंशी लाख दोन हजार एकशे सत्याहत्तर फक्त) पेक्षा ६.४५% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.८४,४९,७०३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११४६ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १०/१०/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ – मा.उषा मुंढे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव…

पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ उद्यान विकसित करण्याचे काम चालु आहे. या नि.क्र.(१५/०१/१६-१७) र.रु.४,२०,८०,६५७) उद्यानाचे आराखडे बनविण्याचे काम मे.सी.बी.ए.लॅन्डस्केप अँन्ड इन्फ्रा.प्रोजेक्टस् यांना देणेत आलेले आहे त्यांनी सदर प्रकल्पासाठी व्यवस्थापन सल्लागार म्हणून मान्यता मिळणेस विनंती केलेली आहे. त्यांना अशाप्रकारच्या विशेष कामाचा अनुभव आहे. त्यांना मनपा नियमानुसार १.२५% फी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११४७ विषय क्रमांक – ३३

दिनांक – १०/१०/२०१७

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ – मा.अमित गावडे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव…

विषय – श्रीम.सोनाली रजनीकांत एक्के, स्टाफ नर्स, तालेरा रुग्णालय यांचा अपील अर्ज…

विषय क्र.३३ कामी मा.आयुक्त यांचा अहवाल अपेक्षित असल्याने तो प्राप्त झालेनंतरचे सभेच्या वेळी विषय क्र.३३ चा विचार करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११४८ विषय क्रमांक – ३४

दिनांक – १०/१०/२०१७

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे

संदर्भ – मा.अमित गावडे, मा.आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव…

दि.१८/१०/२०१७ रोजी दिवाळी सण असल्याने दि.१८/१०/२०१७ ची मा.स्थायी समिती सभा मंगळवार दि.१७/१०/२०१७ रोजी दुपारी १२.०० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११४९ विषय क्रमांक – ३५

दिनांक – १०/१०/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.उषा मुंढे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव…

निळूभाऊ फुले नाट्यगृह, पिंपळे गुरव येथील पार्किंग व कॅन्टीन प्रतिभा महिला प्रतिष्ठाण या संस्थेस ४ वर्षे कालावधीसाठी चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११५० विषय क्रमांक – ३६

दिनांक – १०/१०/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.उषा मुंढे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

ड क्षेत्रीय कार्यालयासमोरील कॅन्टीन केबीन प्रतिभा महिला प्रतिष्ठाण या संस्थेस ३ वर्षांसाठी चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११५१ विषय क्रमांक – ३७

दिनांक – १०/१०/२०१७

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ – मा.हर्षल ढोरे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड क्षेत्रातील महिला बचतगटांना प्रोत्साहन देणेकामी दिवाळी सणानिमित्त वस्तूंचे प्रदर्शन व विक्री करणेकामी प्रति स्टॉल र.रु.२००/- दराने उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११५२ विषय क्रमांक – ३८

दिनांक – १०/१०/२०१७

सूचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ – मा.कुंदन गायकवाड, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या वतीने दि.१५/१०/२०१७ रोजी आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, मोशी येथे महापौर चषक आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. सदर स्पर्धेत एकूण र.रु.५२,८४,०००/- रोख बक्षिसे अदा करण्यात येणार आहे. सदर रक्कम खेळाडूंना रोख स्वरुपात देणेची मागणी आहे. म.न.पा.स बक्षिसाची रोख र.रु.५२,८४,०००/- काढून अदा करणेस तांत्रिक अडचण येत आहे.

तरी महापौर चषक आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा २०१७ अनुषंगाने द्यावयाची रोख बक्षिसाची र.रु.५२,८४,०००/- ही करारनामा करुन, पिंपरी चिंचवड शहर जिल्हा कुस्तीगीर संघ, चिंचवड यांच्या नावे आगाऊ स्वरुपात अदा करुन त्यांचेमार्फत रोख बक्षिस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११५३ विषय क्रमांक – ३९

दिनांक – १०/१०/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.उषा मुंढे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव (नवीन प्रभाग क्र.३१) येथील प्रस्तावात नमूद स्थापत्य विषयक कामांमध्ये तरतूद कमी असल्याकारणाने सदर कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यास तांत्रिक बाबींची अडचण निर्माण होत आहे. तरी या आर्थिक वर्षामध्ये खर्चाची बाब गृहीत धरुन शहर विकास

आराखडा या लेखाशिर्षामधील र.रु.३,००,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन कोटी फक्त) तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११५४ विषय क्रमांक – ४०

दिनांक – १०/१०/२०१७

सूचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ – मा.कुंदन गायकवाड, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र.१ चिखली या प्रभागास अल्प तरतुद केलेली असून, सदर कामांच्या निविदा काढणेसाठी कामांच्या तरतुदीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. तरी सदर कामांमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद रक्कम रुपये ६,१०,००,०००/- (अक्षरी र.रु.सहा कोटी दहा लाख फक्त) वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११५५ विषय क्रमांक – ४१

दिनांक – १०/१०/२०१७ विभाग–पर्यावरण अभियांत्रिकी

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पर्यावरण/कावि/१०/६३५/२०१७ दि.१०/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क व ड प्रभागातील (क,ड व ई क्षेत्रीय) स्लजची मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतुक करणे या विषयान्वये या विभागाकडील निविदा क्रमांक HO/Env/11/8/2015-16 नुसार सदर काम मे.शुभम उद्योग यांना मिळाले असल्याने दिनांक ३०/५/२०१६ रोजीचे कार्यारंभ आदेशान्वये ठेकेदार यांनी कामास सुरुवात केलेली आहे. सदर कामाच्या मुळ मुदतीपर्यंत झालेला खर्च निविदा रक्कमेपेक्षा कमी झालेले असल्याने सदर कामास दिनांक ३०/०६/२०१७ रोजी पर्यंत मुदतवाढ घेणेत आलेली आहे.

सन २०१७ मध्ये मनपाचे निवडणूक ठरल्याने तसेच मनपाचे अंदाजपत्रकास मा.महापालिकेची मंजुरी मिळणेस विलंब झालेने नवीन कामाची निविदा काढणे शक्य झाले नाही. सद्यस्थितीत अशा प्रकारचे नव्याने करणेत येणा-या कामास तांत्रिक मान्यता घेणेत आली असून निविदा प्रसिद्धी करणेत आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडील तरतुदीनुसार तसेच आरोग्याचा व मैलाशुद्धीकरण केंद्राच्या प्रक्रियेच्या दृष्टीकोनातून स्लजची वाहतुक करणे गरजेचे आहे.

यामुळे नवीन कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कामाचा आदेश होईपर्यंत मैलाशुद्धीकरण केंद्रातील स्लजची वाहतुक करणे आवश्यक असलेने, सदर चालू असलेल्या कामास मुदतवाढ देणे योग्य होईल असे वाटत आहे. तसेच मुळ निविदा दराने (१३.१० टक्के कमी) वाढीव मुदतीत सदर काम करणेस ठेकेदार यांनी दिनांक ३०/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये संमती दर्शविली आहे.

सबब सदर कामास ३१ ऑक्टोंबर २०१७ पर्यंत/निविदा कार्यवाही पूर्ण होऊन कामास कार्यारंभ आदेश देणेपर्यंत (whichever is earlier) मुदतवाढीसह तसेच वाढीव मुदतीमध्ये होणा-या मुळ निविदा

रक्कमेसह (४४,५७,१९९ + ३५,००,०००/-) एकुण र.रु.७९,५७,१९९/- या सुधारित रक्कमेचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११५६ विषय क्रमांक – ४२

दिनांक – १०/१०/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ – मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

ह क्षेत्रीय कार्यालय येथील कॅन्टीन बी.एस.एम.एंटरप्रायजेस या संस्थेस ११ महिने कालावधीसाठी चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------


**निर्णय-** सन्मा.नगरसदस्या वैशालीताई काळभोर यांच्या वॉर्डमध्ये पाण्याचा प्रश्न बिकट आहे. या भागातून संत तुकारामनगरला पाणीपुरवठा होतो. यांच्या प्रभागातल्या टाक्या पहिल्या भराव्यात. वारंवार तक्रार करुनही तक्रारीचे निवारण होत नाही. टाक्यांना व्हॉल्व्ह बसवता येतो का याचाही विचार व्हावा.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/७७/२०१७
दिनांक - १६/१०/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.